जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेल्या बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने लेवा गणबोली दिना निमित्त मंगळवार, दि. ३ डिसेंबर रोजी लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालयात लेवा गणबोली कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

जुना खेडी रोड शंकरराव नगर येथे असलेल्या लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालयात सकाळी ११ वाजता हे कवी संमेलन होणार आहे. यावेळी लेवा गणबोलीचे अभ्यासक प्रा.व.पु. होले, प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे, प्राचार्य डॉ. पी.आर. चौधरी उपस्थित राहणार आहेत. लेवा गणबोली कवी संमलेनात प्रा.संध्या महाजन, अरविंद नारखेडे व तुषार वाघुळदे हे कविता सादर करणार आहेत. अशी माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. नितीन बडगुजर यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत असलेल्या बौध्दअध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. एन.के. ठाकरे यांचे व्याख्यान होणार आहे.

सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही. एल. माहेश्वरी राहणार असून याच कार्यक्रमात डॉ.एन.के. ठाकरे यांच्या 'निंबोळ' या पुस्तकाचे प्रकाशन माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २७ नोव्हेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी